| MHAU050021772023 | **<u>फौ.कि.अर्ज क्र.३३९/२०२३</u>**<br>पंकज दिलीपराव कुंदे वि. सरकार<br>गु.र.क्र.११२/२०२३, दुय्यम निरीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क ड–१. |
| --- | --- |

## <u>निशाणी १ खालील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार पंकज दिलीपराव कुंदे याने त्याच्या मालकीची हिरो होंडा स्पलेंडर मोटारसायकल क्र. एमएच–२०/ए.डबल्यु–२५५७, चेसिस क्र.06EACF25738 परत मिळण्याकामी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील सरकारी अभियोक्ता व अन्वेषण अधिकारी यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे वाचले.

३. अर्जदाराने अर्जाचे पुष्टयर्थ निशाणी क्र.३ नुसार जप्त मोटारसायचे वेहीकल पर्टीक्युलर्सची प्रत, अपंक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

४. अर्जदाराने जप्त वाहन हे त्याच्या मालकीचे असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केलेले आहे. विव्दान सरकारी वकीलांनी त्यांचा जबाब दाखल करुन कथन केले की, सदरची मोटरसायकल ही गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आली होती, तसेच सदरची मोटरसायकल ही साक्षीपुराव्याकामी गजरेची आहे, तरी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. तपासी अधिकारी यांनी देखील निशाणी क्र. ६ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, सदरची मोटरसायकल पुराव्याकामी गरजेची आहे तरी सदरची मोटरसायकल ही अर्जदारास परत केली तर सदर वाहनाचा वापर पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करण्यासाठी होऊ शकतो, तसेच तरी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. अभियोग पक्षाने उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेला परस्पर विरोधी

युक्तिवाद विचारात घेवून अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. निशाणी ३ नुसार दाखल केलेले वेहीकल पर्टीक्युलर्सचे अवलोकनार्थ जप्त मोटारसायकल ही अभिजीत दिलीपराव कुंदे यांचे नावावर असल्याचे दिसते. मुळ मालक अभिजीत दिलीपराव कुंदे यांनी निशाणी क्र.७ वर त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. मुळ मालक अभिजीत दिलीपराव कुंदे हे दिनांक २५/०८/२०२३ रोजी न्यायालयात हजर आहेत, त्यांनी निशाणी क्र. ७ वरील प्रतिज्ञापत्रामध्ये तसेच न्यायालयासमोर असे कथन केले आहे की, अर्जदार पंकज दिलीपराव कुंदे हा त्याचा भाऊ असुन सदर वाहन हे अर्जदाराच्या ताब्यात देण्यास त्यांची हरकत नाही, तसेच सदरचे वाहन हे अर्जदारास देण्यात यावे.

६. जप्त मोटारसायकल ही जप्त केल्यापासून पोलीस स्टेशनला पडून आहे. तसेच सदरचे वाहनाचा विमा संपलेला असुन, अर्जदाराने सदर वाहनाचा ताबा मिळालेनंतर तात्काळ विमा करुन घेण्याचे हमीपत्र निशाणी ०७ वर दिलेले आहे. जर जप्त मोटारसायकल ही जशीच्या तशी पोलीस स्टेशनला पडून राहिली तर तिची किंमत तर कमी होईलच परंतू तिच्या उपभोगापासून अर्जदार हा वंचित राहिल. अर्जदारास दैनंदिन उपजिवीकेसाठी सदरची मोटर सायकल लागणार आहे. तसेच मा. सर्वोच्य न्यायालयाच्या **सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार** या केसमध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे व तपासी अधिकारी व सहा.सरकारी वकील यांची हरकत विचारात घेता सदरचे जप्त वाहन हे योग्य त्या अटी व शर्ती वरती अर्जदाराच्या ताब्यात देणे उचित ठरते. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | | **आदेश** |
|---|---|---|
| १. | | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | | तपासी अधिकारी यांना असा आदेश करण्यात येतो की, त्यांनी हिरो होंडा स्पलेंडर मोटारसायकल क्र. एमएच-२०/ए.डबल्यु-२५५७, चेसिस क्र.06EACF25738 ही अर्जदार पंकज दिलीपराव कुंदे यास पुढील अटींवर ताब्यात द्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | **अ.** | अर्जदाराने सदरचे वाहन त्याचे ताब्यात घेण्यापूर्वी रुपये ८०,०००/- चा सुपुर्तनामा तपासी अधिकारी यांचे समक्ष सादर करावा. |
| | **ब.** | अर्जदाराने न्यायालयाचे परवानगीशिवाय सदरच्या मोटारसायकल मध्ये कोणत्याही प्रकारे बदल अथवा हस्तांतरण करणेचा नाही. न्यायालय आदेश करील तेंव्हा सदरची मोटारसायकल न्यायालयात हजर करणेची आहे. |
| | **क.** | सदरची मोटारसायकल अर्जदारचे ताब्यात देतेवेळी तिचा पंचनामा व छायाचित्र काढण्यात यावे व ते दोषारोपपत्रासोबत न्यायालयात दाखल करावे असे अन्वेषण अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते. |
| | **ड.** | तपासी अधिकारी यांस निर्देशित करण्यात येते की, अर्जदाराने सादर केलेला सुपुर्तनामा दोषारोप पत्रासोबत सदर प्रकरणामध्ये दाखल करावा. |
| **३.** | | सदरचे वाहन वापरुन पुन्हा अशा प्रकारचा गुन्हा करायचा नाही. |
| **४.** | | अर्जदाराने सदरचे वाहन त्याचे ताब्यात मिळाल्यावर त्यांने तात्काळ विमा काढावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHAZIYA KAMRAN KHAN
Date: 2023.08.29 11:00:20 +0530

दिनांकः २५/०८/२०२३. ( श्रीमती एस. के. खान )

वैजापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापूर.

न्यायालय क्र.०२

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shrirang M. Bhosale,<br>Stenographer Grade-III |
| Court | : Smt. S. K. Khan,<br>J.M.F.C., Court No.2, Vaijapur,<br>Dist. Aurangabad. |
| Date | : 25/08/2023. |
| Order signed by the presiding officer on | : 25/08/2023. |
| Order uploaded on | : 29/08/2023 |